आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२३ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘मन की बात’ या कार्यक्रमात प्रतिपादन

- भारत आणि ब्रिटन यांच्यातल्या प्रस्तावित मुक्त व्यापार करारासाठी उद्यापासून चर्चा सुरू होणार

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रस्तावाच्या सादरीकरणासाठी महाराष्ट्र सरकारचं शिष्टमंडळ पॅरिसला रवाना

**आणि**

- आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताची पाकिस्तानशी लढत

<><><><><>

अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला भारतीय युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११९वा भाग होता. नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारून त्याचा अवलंब करण्यात भारतातील लोक कोणापेक्षाही मागे नसल्याचं ते म्हणाले.

गेल्याच महिन्यात इस्रोचं शंभरावं रॉकेट प्रक्षेपण झाल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड मोदी बाईट MKB ISRO**

इसरोच्या यशाचा परीघ खूपच मोठा असल्याचं म्हणत इस्रोच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत गाठलेल्या यशाचा आढावा त्यांनी घेतला. आता आपल्या अंतराळ शास्त्रज्ञांच्या पथकांमध्ये महिलांचा सहभाग वाढत असल्याची बाब त्यांनी नमूद केली. देशाच्या युवा वर्ग अंतराळ क्षेत्राकडे वळू लागला असून, त्यामुळेच गेल्या काही वर्षांत या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट-अप आणि खासगी क्षेत्रातल्या अंतराळ कंपन्यांची संख्या शेकडोच्या घरात पोहचली असल्याचं त्यांनी सांगितलं.

अंतराळ क्षेत्राप्रमाणेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातही भारत वेगानं आपली ओळख प्रस्थापित करत असल्याचं ते म्हणाले. या क्षेत्राशी संदर्भात पॅरीस इथं झालेल्या परिषदेत भारताच्या प्रगतीचं जगानं कौतुक केल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांसोबत सामायिक केला.

येत्या काही दिवसांमध्ये आपण राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणार असल्याचं स्मरण करून देताना त्यांनी आपल्या मुलांना विज्ञानाची आवड असणं गरजेचं असल्याचं सांगितलं. यादृष्टीनं त्यांनी ‘वैज्ञानिक म्हणून एक दिवस’ ही कल्पना मांडली. नागरिकांनी आपल्या सोयीचा दिवस निवडून त्या दिवशी एक शास्त्रज्ञ, एक वैज्ञानिक म्हणून जगून पाहावं, संशोधन प्रयोगशाळा, तारांगणं किंवा अंतराळ संशोधन केंद्रांना भेट द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

पुढच्या महिन्यात ८ मार्च रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणजे आपल्या महिला शक्तीला वंदन करण्याची विशेष संधी असल्याचं ते म्हणाले. यंदाच्या महिला दिनानिमीत्त ८ मार्च रोजी, एका दिवसासाठी आपण आपली समाजमाध्यम खाती देशातल्या काही प्रेरणादायी महिलांकडे सोपवणार आहोत. या खात्यांवर त्या त्यांचं काम, त्यांच्या समोरची आव्हानं, अनुभव देशवासियांसोबत सामायिक करतील, असं ते म्हणाले. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी महिलांनी यासाठी नमो ॲपवर तयार केलेल्या मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आजच्या मन की बातमध्ये प्रधानमंत्र्यांनी उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतल्या यशवंतांचं अभिनंदन केलं. यावेळी त्यांनी इतर पदक विजेत्यांसह महाराष्ट्रातील किरण म्हात्रे, तेजस शिरसे या खेळाडूंचा उल्लेख केला.

एक तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारताला लठ्ठपणाच्या समस्येवरही मात करावी लागेल, असं प्रधानमंत्री म्हणाले. ही समस्या वाढत असल्याची आकडेवारी गंभीर असून, आपण एकत्रितपणे छोट्या -छोट्या प्रयत्नांतून याचा सामना करायला हवा असं ते म्हणाले. लठ्ठपणाचा सामना करणं ही वैयक्तिक निवड नाही तर कुटुंबाप्रती आपली जबाबदारी असल्याचं ते म्हणाले. याच अनुषंगानं आपल्या आहारातला खाद्य तेलाचा वापर दहा टक्क्यांनी कमी करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. यासोबतच या समस्येचं गांभीर्य आणि त्यावर मात करण्यासाठी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा, क्रीडापटू निखत जरीन तसंच डॉ. देवी शेट्टी यांचे मार्गदर्शनपर संदेशही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवले.

देशातली वैशिष्ट्यपूर्ण **जैवविविधता** आणि आपल्या स्थानिक संस्कृतीधलं त्याचं स्थान याबद्दलची माहितीही प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये दिली. महाराष्ट्रात वाघोबाची पूजा करण्याची परंपरा असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. या जैवविविधतेच्या जतन संवर्धन आणि संरक्षणासाठी देशभरातला आदिवासी समाज करत असलेल्या प्रयत्नांचंही त्यांनी कौतुक केलं. यामुळेच देशात वाघ, बिबटे, आशियाई सिंह, गेंडे आणि बारासिंघा अशा प्राण्यांची संख्या झपाट्यानं वाढू लागली असल्याचं ते म्हणाले.

देशात इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असल्याचा उल्लेखही प्रधानमंत्र्यांनी केला. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी होणाऱ्या परीक्षा पे चर्चा हा उपक्रम यंदा वेगळंपणानं आयोजित केला गेला आणि त्याबद्दल सकारात्मक अभिप्राय मिळत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. परीक्षा देत असलेल्या विद्यार्यांनी आनंदी आणि तणावमुक्त राहावं, असा सल्ला प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून पुढचे तीन दिवस मध्यप्रदेश, बिहार आणि आसाम या राज्यांचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते आज दुपारी मध्यप्रदेशच्या छत्रपूर जिल्ह्यात बागेश्वर धाम वैद्यकीय आणि विज्ञान संशोधन संस्थेची पायाभरणी केली जाणार आहे. या कर्करोग रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रं आणि निष्णात डॉक्टरांकडून वंचित वर्गातील कॅन्सर रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत. प्रधानमंत्री भोपाळ इथं दोन दिवसीय जागतिक गुंतवणूकदार परिषदेचंही उद्घाटन करणार आहेत.

<><><><><>

भारत आणि ब्रिटन यांच्यात प्रस्तावित असलेल्या मुक्त व्यापार करारासाठी उद्यापासून चर्चा सुरू होणार आहे. या संदर्भात ब्रिटनचे व्यापार सचिव जोनाथन रेनॉल्ड्स आणि भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्यात द्विपक्षीय बैठक होणार आहे. १३ जानेवारी २०२२मध्ये या संदर्भातल्या बैठका सुरू झाल्या होत्या. डिसेंबर २०२३पर्यंत या बैठकांचे १३ टप्पे पूर्ण झाल्यानंतर मे २०२४ मध्ये ब्रिटनच्या निवडणुकांमुळे १४वा टप्पा प्रलंबित होता. या टप्प्यातली बैठक उद्यापासून सुरू होईल. द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक वाढवणं हा या कराराचा उद्देश आहे. भारताचं माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आणि आरोग्य सेवांमधल्या कुशल व्यावसायिकांना ब्रिटनच्या बाजारपेठांमध्ये स्थान मिळावं तसंच, ब्रिटनहून येणारा मद्यपुरवठा, मांस आणि चॉकलेट आणि मिठाईवरच्या आयात शुल्कात कपात अशा मुद्यांवर चर्चा होणार आहे.

<><><><><>

भारत-फ्रान्स संरक्षण सहकार्य बळकट करायच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी फ्रान्सच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. लष्करप्रमुख उद्या पॅरिसमधल्या लेस इनव्हॅलिडेस इथं फ्रान्सचे

लष्करप्रमुख जनरल पियरे यांच्याशी चर्चा करतील, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. दोन्ही राष्ट्रांमधले लष्करी संबंध अधिक मजबूत करणं हे या बैठकीचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रस्तावाच्या सादरीकरणासाठी महाराष्ट्र राज्य सरकारचं चार सदस्यीय शिष्टमंडळ आज पॅरिसला रवाना झालं. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालच्या या शिष्टमंडळात अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उप संचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे.

राज्य शासनानं 'मराठा लष्करी भूप्रदेश' या संकल्पनेअंतर्गत हा प्रस्ताव सादर केला आहे. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतल्या जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

<><><><><>

चंडीगढ इथं आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांशी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल चर्चा केली. किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांशी अतिशय सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा झाली, शेतकरी नेते जगजीत सिंग दल्लेवाल यांच्या सर्व मागण्या ऐकून घेतल्या, असं केंद्रीय कृषी मंत्री चौहान यांनी सांगितलं. चर्चेची पुढची फेरी १९ मार्चला होणार आहे.

<><><><><>

समाजसेवक स्वामी दयानंद सरस्वती यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली वाहिली. स्वामी दयानंद सरस्वती यांनी शिक्षण आणि

सामाजिक सुधारणेसाठी केलेल्या कामामुळे समाजात सकारात्मक बदल झाला, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्डेडियमवर दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल.

स्पर्धेच्या सुरुवातीच्या सामन्यात भारताने बांगलादेशावर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला होता. तर पाकिस्तानला कराची इथं झालेल्या सामन्यात न्यूझिलंडकडून ६० धावांनी पराभव स्वीकारला होता. आजचा सामना जिंकला, तर भारताचं उपांत्य सामन्यातलं स्थान निश्चित होईल.

**<><><><><>**

भुवनेश्वरमधल्या कलिंगा स्टेडियम इथं काल रात्री झालेल्या हॉकी एफआयएच प्रो लीगमधल्या सामन्यांमध्ये भारतीय पुरुष आणि महिला संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर विजय मिळवला. पुरुष संघानं आयर्लंडचा ४-० नं पराभव केला. तर महिला संघानं आधीच्या सामन्यातल्या पराभवाची परतफेड करत जर्मनीवर १-० नं विजय मिळवला.

भारताच्या पुरुष हॉकी संघाचा सामना उद्या संध्याकाळी साडेसात वाजता इंग्लंडविरुद्ध होईल. तर महिला संघाचा सामना नेदरलँडविरुद्ध उद्या संध्याकाळी सव्वा पाच वाजता होईल.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेत भारतातल्या महिला शांती सैनिकांनी सकारात्मक परिणाम दाखवून दिल्याचं संयुक्त राष्ट्रांचे उप-सचिव जीन-पियरे लॅक्रोइक्स यांनी म्हटलं आहे. शांतता मोहिमेत महिला कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळे

सामुदायिक संबंध अधिक मजबूत व्हायला मदत होते, या मोहिमेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होते आणि चिरस्थायी शांततेत त्यांचं योगदान असतं, असं एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत, लॅक्रोइक्स यांनी सांगितलं.

<><><><><>

जर्मनीत आज सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात जर्मनीचे चॅन्सलर ओलाफ शोल्ज यांचं सरकार कोसळल्यामुळे ही निवडणूक होत आहे.

<><><><><>

पॅलेस्टिनी दहशतवादी गट हमासकडून ओलिसांच्या यापुढल्या गटाच्या सुटकेची पुष्टी होईपर्यंत आणि यासाठी कोणतीही अपमानास्पद वागणूक न देता ही सुटका केली, तरच ६२० पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका इस्त्रायल करेल, असं इस्त्रायलनं म्हटलं आहे. काल हमासनं सहा इस्त्रायली ओलिसांचं सार्वजनिक हस्तांतरण केल्यानंतर इस्त्रायलनं हा निर्णय घेतला.

//<><><><><> //